# जलतरण स्पर्धेत नांदेड पोलिसांना १० पदके

**नांदेड / प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य व्हेटरनर्स अॅक्वॅटिक असोसिएशनच्या वतीने कोल्हापुर येथे आयोजित २४ व्या राज्यस्तरीय मार्स्टस जलतरण स्पर्धेत नांदेड जिल्हा पोलीस दलातील तिघांनी एकुण १० पदक पटकावले.





महाराष्ट्र राज्य व्हेटरनर्स अॅक्वाटिक असोसिएशन, महाराष्ट्र यांनी कोल्हापुर येथील सागर पाटील जलतरण तलाव येथे दि. १ व २ ऑक्टोबर रोजी २४ व्या राज्यस्तरीय मार्स्टस जलतरण स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत राज्यातील अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत नांदेड जिल्हा संघात सहभागी असलेलो पोलीस अंमलदार जयप्रकाश क्षीरसागर यांनी ५० मीटर फ्री स्टाईल गोल्ड मेडल, २०० मीटर वैयक्तिक मिडले रिले गोल्ड मेडल, २०० मीटर सांघिक मिडले रिलेमध्ये गोल्ड मेडल व ५० मीटर बटरफ्लाय सिल्वर मेडल असे एकुण ३ सुवर्ण,१ रजत पदकाची कमाई केली. पोलीस अंमलदार रामेश्वर जाधव यांनी १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात गोल्ड मेडल, ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात सिल्वर मेडल व २०० मीटर सांघिक मिडले रिले प्रकारात ब्रॉन्झ मेडल पटकावत एकुण ३ मेडल्सची कमाई केली. तसेच पवन चौदंते यांनी ५० मीटर बॅकस्ट्रोक गोल्ड मेडल, ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक सिल्वर मेडल व २०० मीटर सांघीक मिडले रीले प्रकारात ब्रॉन्झ मेडल पटकावले. या यशाबद्दल पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अश्विनी जगताप, विजय धोंडगे,संतोष सोनसळे यांनी विजयी पोलिसांचे कौतुक केले.

दै. पुण्यनगरी दि. 19/10/2023

# कॅनाल रोड दरोड्यातील अनोळखी आरोपीचे रेखाचित्र प्रसिद्ध

**नांदेड/प्रतिनिधी**

शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका एकट्या महिलेच्या घरात घुसून चाकूने हल्ला करुन जबरी चोरी करणाऱ्या आरोपीचे रेखाचित्र भाग्यनगर पोलिसांनी प्रसिद्ध केले आहे. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध ३७३/२३ नुसार भादंविच्या कलम ३०७, ३९४, ३९७, ४५२, ३४२, ५०६ सह सहकलम ५/२७, २७ आर्म अॅक्टप्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



दि.१० ऑक्टोबर रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास कॅनॉल रोडवर असलेल्या व्यंकटेश्वरानगरमधील वैभव जीमसमोर राहणाऱ्या शुभांगी दोडके (३८) या त्यांच्या राहत्या घरी एकट्या असताना एक अनोळखी इसम येऊन त्यांना येथे गोर व जाधव राहतात का? असे विचारून त्यांना एलआयसीचे कागदपत्रे द्यावयाचे आहेत,असे सांगितले. त्यानंतर पिण्यासाठी पाणी मागीतले. शुभांगी दोडके या पाणी आणण्यासाठी घरात जाताच घराचा दरवाजा बंद करुन धारदार चाकुने वार करुन गळ्यातील ५ ग्रॅम सोन्याचे मनी मंगळसूत्र व १ मोबाईल हिसकावून त्याने पोबारा केला. या अनोळखी आरोपीचे वर्णन व त्याचे काढलेले रेखाचित्र (स्केच ) प्रसिद्ध करण्यात आले आहे. एक अनोळखी आरोपी इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष, बांधा मध्यम, वर्ण सावळा, उंची अंदाजे साडेपाच फुट, मराठी बोलणारा आरोपीचा शोध लावण्यासाठी त्याचे रेखाचित्र प्रसिद्ध करण्यात आले आहे.